# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत तळमजला पुणे ४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई -: मेल आयडी-sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/जि.म.स.बँ./निवडणुक /मा.सु./२०१९
दिनांक : ~~३०/११/२०१९~~ 10 DEC 2019 8621

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक (सर्व)

**विषय : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या समिती निवडणुक प्रक्रीयेबाबत अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

वाचा : १) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४
२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली आहे. राज्यातील ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका निवडणूकीस पात्र झालेल्या आहेत त्यांची निवडणूक प्रक्रिया सुरू करणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांची मतदार यादी कोणत्या अर्हता दिनांकावर तयार करण्यात यावी,याबाबत प्राधिकरणाने त्यांचे जा.क्र. ६९५४ दि. ०४.०९.२०१९ ने अवगत केलेले आहे. त्याप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबत मतदार यादीचा अर्हता दिनांक निश्चित करण्यात यावा. राज्यातील २१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या संचालक मंडळाची मुदत मे २०२० मध्ये संपुष्टात येणार आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१०) मधील तरतूदीनुसार "त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही मावळत्या समितीच्या सदस्यांचा पदावधी संपल्यावर तात्काळ नव्याने निवडून आलेल्या समितीच्या सदस्यांना पदग्रहण करणे शक्य व्हावे म्हणून विद्यमान समितीची मुदत संपणेपूर्वी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाव्दारे प्रत्येक समितीची निवडणूक घेण्यात येईल" अशी तरतूद आहे. व उक्त कायद्याच्या कलम ७३ कब (१४) (अ) नुसार "प्रत्येक सहकारी संस्थेने तिची मुदत संपण्याच्या किमान ६ महिने अगोदर संचालक मंडळाचा पदावधी संपणेबाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास कळविणे हे तिचे कर्तव्य आहे" अशी तरतूद आहे. त्यामुळे सदर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही विनाविलंब करणे गरजेचे आहे. सदर कार्यवाही करताना ती सुलभ व्हावी तसेच त्यामध्ये राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये सुसुत्रता, एकसारखेपणा असावा या हेतूने या प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सूचना प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अधिकारानूसार पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

१.    सहकारी संस्थेने करावयाची कृती :

१.महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ५(१) अन्वये नमुना ई-१ आणि नियम ५(२) अन्वये नमुना ई-२ मध्ये माहिती जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत विभागीय सहनिबंधक) देणे.

२. ई-१ आणि ई-२ नमुन्यासोबत संस्थेचे मंजुर उपविधीची प्रत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत विभागीय सहनिबंधक) देणे.

३. बँकेने प्राथमिक मतदार यादी ही संचालक मंडळाची मुदत संपुष्ठात येण्याच्या तारखेवर तयार करावयाची आहे निवडणूक निकालाच्या दिनांका पासून पाच वर्षाच्या कार्यकालाची गणना करावयाची आहे.प्राथमिक यादी तयार करताना खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

अ) महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ९, १० अन्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने सभासद संस्थांकडून प्राप्त झालेल्या ठरावानूसार बँकेस दिलेल्या यादीवरुन प्राथमिक मतदार यादी तयार करताना संस्था सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६(१) व कलम २७ अन्वये पात्र असावेत. ['थकबाकीदार' ह्या संज्ञेच्या अन्वयार्थासाठी कलम ७३ कअ (१)(i)(फ) देखील विचारात घेणेत यावे] तसेच उपविधीमधील तरतुदीनुसारही मतदार यादीत नाव समाविष्ठ करण्यास सदर संस्था पात्र असावी. त्याचप्रमाणे संस्थेने ठरावाव्दारे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडलेली व्यक्ती कलम २७(१०) अन्वये पात्र असावी. प्रारुप मतदार यादी चार प्रतीत, मतदारसंघनिहाय मतदान केंद्रनिहाय सॉफ्ट व हार्ड कॉपीमध्ये इ-३ व इ-३(१) मध्ये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या मुदतीत त्यांना बँकेने सादर करावी.

ब) क्रियाशील सभासदत्व ही बाब या निवडणुकीसाठी लागू झालेली आहे. त्यामुळे प्राथमिक मतदार यादी तयार करताना नमुना जे-१ व जे-२ मध्ये क्रियाशिल व अक्रियाशिल सभासदांची यादी करून ती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना बँकेने मुदतीत सादर करावयाची आहे .

क)संस्थांनी ठराव सादर करताना उपविधीतील तरतुदींचे पालन करुन अत्यंत पारदर्शक पध्दतीने संस्थेच्या संचालक मंडळाची/ अधिमंडळाची बैठक बोलवावी. सदर सभेची नोटीस सर्व संचालकांना मिळाल्याची खात्री संस्थेच्या सचिवाने करावी. सभेत उपस्थित संचालकांची हजेरी रजिस्टरवर स्वाक्षरी घ्यावी. जे संचालक अनुपस्थित आहेत त्यांची अनुपस्थिती हजेरी रजिस्टरवर दाखवावी आणि सदर सभेत प्रतिनिधी नेमणुकीचा ठराव पारीत करावा व त्याची प्रत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास देवून त्याची पोहोच घ्यावी. एका संस्थेने एकच ठराव पारित करावा.

ड) ज्या सहकारी संस्था बँकेच्या सभासद आहेत परंतू दिलेल्या मुदतीत त्या संस्थेने प्रतिनिधीच्या नावाबाबतचा ठराव सादर केलेला नाही व अशी संस्था मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करणेसाठी पात्र आहे. अशा सभासद असलेल्या सहकारी संस्थाच्या नावाचा समावेश मतदार यादीमध्ये करणे आवश्यक आहे.केवळ प्रतिनिधीच्या नावाचा ठराव प्राप्त झालेला नाही म्हणून मतदार यादीमधून त्या संस्थेचे नाव वगळण्यात येवू नये. याबाबत दि.६.०८.२०१८ रोजी निवडणूक नियम १० मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे

२. <u>जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही :-</u>

i) सदस्य संस्थांचे ठराव दि.१८.१२.२०१९ पासून दि १६.०१.२०२० या कालावधीदरम्यान [नियम १० (२)] अन्वये मागविण्यात यावेत. त्यासाठी सर्व संस्थांना पत्रे RPAD ने पाठवावीत. आवश्यकतेप्रमाणे एक अतिरीक्त प्रत हस्ते पोच करण्यात यावी व याबाबतची ठळक प्रसिध्दी वर्तमानपत्रात द्यावी.

ii) संस्थांनी ठराव सादर करताना कायद्यातील कलम २७ (१०), व संलग्न कलम ७३ कअ (१)(i) (फ) अन्वयेच्या तरतुदी विचारात घेऊन सादर करावेत. सदर ठराव संस्थेचे उपविधीतील तरतुदीनुसार उदा.संचालक मंडळाने किंवा अधिमंडळाचे वार्षिक बैठकीने ठराव पारीत केलेले असावेत. जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या सदस्य असलेल्या प्राथमिक कृषी पतसंस्था जर थकीत असतील तर अशा संस्थेच्या संचालकांच्याऐवजी सदर संस्थेच्या थकबाकीदार नसलेल्या एखाद्या सदस्याचा प्रतिनिधी म्हणून समावेश करणेचा ठराव करता येईल किंवा जर सदरची संस्था थकबाकीदार नसेल तर सदर संस्थेच्या संचालक मंडळ सदस्याचा किंवा एखाद्या सभासदाचा प्रतिनिधी म्हणून ठराव करता येईल. या बाबत कलम ७३ कअ (१)(i)(फ) (ii) चे अवलोकन करावे.इतर संस्थांचे बाबतीत कलम ७३ कअ (१)(i)(फ)(i) अन्वये अपात्रता नसावी आणि सर्व संस्थांच्या बाबतीत कलम ७३ कअ (१)(i)(फ)(iii) अन्वये कार्यवाही केलेली नसावी असे कळवावे. [नियम १० (३) अन्वये करावयाच्या ठरावाचा नमूना सोबत जोडला आहे. ]

iii) एकाच संस्थेमध्ये मुळ ख-या ठरावा शिवाय बोगस ठराव करण्याची प्रवृत्ती आढळून आल्यास संबधितां विरुध्द कायद्यातील कलम १४६ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो याची पुरेशी जाणिव संबंधीतांना करून देण्यात यावी. संस्थेच्या प्रतिनिधीमध्ये बदल करणेबाबत विद्यमान निवडणूक नियम १० (४) नूसार तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार एकदा पाठविलेल्या प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास अथवा संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ गठीत झाल्यासच ठरावात बदल करुन नवीन प्रतिनिधीचे नाव प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणेपूर्वी सूचविता येईल याची सर्व संबंधीतांना पत्राव्दारे कल्पना देण्यात यावी.

iv) असे ठराव प्राप्त झाल्यानंतर प्राथमिक/ प्रारुप मतदार यादी तयार करण्यासाठी संस्थानिहाय प्राप्त ठरावाची यादी जसजसे प्राप्त होतील तसतसे प्राधिकृत अधिकाऱ्याकडुन दैनंदीन प्राप्त करुन घ्यावे व ती यादी तयार करुन <u>दि.१७.०१.२०२०</u> रोजी बँकेस सादर करावी व बँकेकडून प्रारुप मतदार यादी दि.२३.०१.२०२० पूर्वी प्राधिकरणाने विहीत केलेल्या प्रमाणपत्रासह प्राप्त करुन घ्यावी. अशी प्रारुप मतदार यादी प्राप्त होताच नियम ११ (१) अन्वये त्वरीत प्रसिध्द करावी तद्नंतर

v) प्रारुप मतदार यादीवर हरकती प्राप्त करुन घेणे [नियम ११ (२)] तद्नंतर

vi) प्रारुप मतदार यादीवरील हरकतींवर योग्य त्या चौकशी अंती निर्णय देणे [नियम ११ (३)] व त्यानुसार सदर निर्णय हरकत घेणाऱ्यास लेखी कळवावे. तद्नंतर

vii) मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे [नियम ११ (४)]अंतीम मतदार यादी प्रसिध्दीचा दिनांक व निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी दिनांकास कमीत कमी १० ते २० (दोन्ही दिवस धरून) या दिवसांचे अंतर ठेवणेची दक्षता घ्यावी म्हणजेच अंतीम मतदार यादी १० दिवस प्रसिध्दीस दिलेली असावी. उपरोक्त नमूद मतदार यादीचे कार्यक्रमासही वर्तमान पत्रात ठळक प्रसिध्दी द्यावी.

viii) सदर यादी प्राधिकरणाच्या किंवा सहकार आयुक्तांच्या व संस्थेच्या वेबसाईटवरही प्रसिध्द करावयाची आहे.

| अ.क्र | कार्यालयाचे नाव व फोन नं. | वेबसाईटचे नाव | संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नाव | फोन नं. |
|---|---|---|---|---|
| १. | सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय | https://sahakarayukta.maharashtra.gov.in | श्रीमती फुफाटे फोन नं.९०४९६२३६५२ | (०२०)२६१२२८४६/४७<br>(०२०)२५६९०४८४,<br>(०२०) २५६९०४८० |

xi) मतदानाची टक्केवारी वाढणेचे दृष्टीने सभासदांचे सोईनुसार मतदान केंद्रांची संख्या पर्याप्त असणे गरजेचे आहे. केवळ मतदान केंद्रांची संख्याच नव्हे तर ती मतदान केंद्रे बँकेचे कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. बँक शाखानिहाय मतदान केंद्र ठेवल्यास सभासदांची गैरसोय होणार नाही याची उचित काळजी घेवून मतदार केंद्राची निर्मिती करावी. मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार राहील याचे योग्य नियोजन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

x) प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र. ५३६४ दि. ३१.०८.२०१७ अन्वये निश्चित केलेल्या पदनामानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांची शिफारस प्राधिकरणास करण्यात यावी.

xi) प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके, सूचना यांची दखल घेवून निवडणूक प्रक्रिया पार पाडावयाची आहे.

xii) प्राधिकरणाने वेळोवेळी वर्तमान पत्रात जाहीरात देण्याचे संदर्भात परिपत्रकाव्दारे व आदेशाव्दारे प्राधिकरणाचे धोरण निश्चित केलेले आहे त्या धोरणाच्या अनुषंगानेच जाहिरात प्रक्रिया राबविली जाईल याची दक्षता घ्यावी.

xiii) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे मा. आयुक्त यांनी दि. ३०.०८.२०१९ च्या अर्धशासकीय पत्रान्वये राज्यातील निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांच्या निवडणूका मुदतीत व अचूक आणि निर्दोष मतदार याद्यांच्या आधारे पार पाडणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांच्या अनुषंगाने आपले अधिनस्त सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका विहीत वेळेत पूर्ण होणेबाबत व त्याबाबतचे नियोजन करणेबाबत कार्यशाळा आयोजन करणेबाबतही सूचीत केलेले होते. तसेच निवडणूका विहीत कालावधीत पूर्ण करणे बाबत अर्धशासकीय पत्रातील सूचना आपले अधिनस्त प्रभाग / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याही निदर्शनास आणून देणेबाबत सूचीत केले होते. सदर अर्धशासकीय पत्रातील सूचना, निर्देश, मार्गदर्शन यांचे अवलोकन करून कोणतीही न्यायालयीन बाब निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. मतदार यादीचा कार्यक्रम जाहिररित्या वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेत यावा. त्यात हरकती मागविण्याबाबतचा कालावधी, ठिकाण, वेळ, हरकती स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पद इ. बाबी स्पष्टपणे नमूद कराव्यात. तसेच ज्या संस्थेच्याबाबत हरकती मागविण्यात येत आहे त्या संस्थेचे नाव, पत्ता, नोंदणी क्रमांक इ. तसेच जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचा कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी, ई-मेल याही बाबी नमुद करुन ई-मेलव्दारे हरकती स्विकारण्यात येतील (शक्य असल्यास) असेही नमुद करावे. सदर प्राप्त हरकतींवर चौकशी केव्हा, कोठे, किती वाजता होणार आहेत याचा गोषवारा दिल्यास, तसेच हरकतीअंती सदर नमुद बाबी विचारात घेऊन पुराव्यानिशी हजर राहण्याबाबत जाहिर नोटीशीत नमुद केल्यास, हरकतींवरील चौकशीची प्रक्रिया सुलभ होऊ शकते. म्हणुन या सर्व बाबी विचारात घेऊन मतदार यादी कार्यक्रम प्रसिध्द करावा.

४. सभासद संस्थांचे ठराव मागविणेपासून तसेच प्राथमिक मतदार यादी तयार करणेपासून ते अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाच्या दिनांकापर्यंतच्या सर्व टप्प्यांचा कार्यक्रम वर्तमान पत्रात जाहिर करून प्रसिध्द करण्यात यावा.

५. प्रारुप मतदार यादी सादर केल्यापासुन ते अंतिम मतदार यादी प्रसिध्द होईपर्यंतचा कार्यक्रम सर्वसाधारणपणे ३५ दिवसांचा आहे. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द होताच सदर बँकेचे निवडणूकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी नेमणुक करणेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा म्हणजे प्राधिकरणाकडुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्याची नेमणुक उचीत कालावधीत होऊ शकेल.

६. प्राधिकरणाकडून निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्त झाल्यानंतर निवडणुक निर्णय अधिकारी यांनी नियम १८ नुसार व दिनांक ०६.०८.२०१८ चे प्रथम सुधारणेमधील तरतूदी नुसार तात्काळ निवडणुक कार्यक्रम तयार करुन तो जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचे अभिप्रायासह आणि स्वाक्षरीसह प्राधिकरणास ई-मेलव्दारे तात्काळ सादर करावा. सदर कार्यक्रमास प्राधिकरणाकडुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर योग्य वेळी वर्तमान पत्रातदेखील जाहिर करून प्रसिध्द करावयाचा आहे. तसेच वेबसाईटवरही प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

७.संस्थेचे पोटनियम दुरुस्त झालेले नसल्यास कायद्यातील कलम ७३ 'ब' व ७३ 'क' अन्वये विहित केल्याप्रमाणे राखीव जागांच्या निवडणुका घेणे अनिवार्य राहिल.

८. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा ) नियम २०१७ चे नियम १८ अन्वये सुरु झालेली निवडणुक प्रक्रिया निवडणुक नियमात दिलेल्या नियम ७५ व ७६ वगळता इतर सर्व नियमांचा विचार करुन व तंतोतंत पालन करुन प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया पार पाडावयाची आहे. सदर नियम स्वयंस्पष्ट असल्यामुळे त्यावर वेगळे मार्गदर्शन करण्याची आवश्यकता नाही.

९.निवडणुक निर्णय अधिकारी यांनी निवडणुक कार्यक्रम नियम १८ नुसार पार पाडल्यानंतर निवडून येणाऱ्या संचालक मंडळाची निवड झाल्याची घोषणा करुन नवनिर्वाचित संचालकांची यादी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेमार्फत प्राधिकरणास ई-१७ नमून्यात सादर करण्यात यावी. तसेच नियम ६४ नुसार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने संचालक मंडळाची निवड झाल्याचे घोषणापत्राची प्रत त्याच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर आणि संस्थेच्या

नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व त्याची प्रत प्राधिकरणास पाठवावी. तद्नंतर आवश्यकता असल्यास विभागीय सहनिबंधक यांनी कलम ७३ अअअ (५) अन्वये तात्काळ उचित कार्यवाही करावी.

१०. नियम ७७ नुसार निवडणुक निर्णय अधिकारी यांचीच पदाधिकारी निवडीचे सभेचा अध्यासी अधिकारी म्हणुन नेमणुक जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने करावी व अध्यासी अधिकाऱ्याने नवनिर्वाचित संचालकांमधुन पदाधिकारी निवडीची प्रक्रिया पुर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्यामार्फत प्राधिकरणास सादर करावा.

वरीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी. तसेच ह्या मार्गदर्शक सुचना निवडणुकीस पात्र सर्व सदस्य सहकारी संस्थांनाही अवगत कराव्यात.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांच्या आदेशानुसार.**

१०/१२/१९

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य , पुणे.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म.मुंबई

२. कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. (सर्व)

त्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त सूचना विचारात घेऊन बँकेच्या मतदार यादी तयार करताना त्यांना अनुषंगीक बाबी विचारात घ्याव्यात.

........................................ या संस्थेच्या दिनांक    /    /२०२० रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र.            ची खरी नक्कल

---

विषय : .................................................................................. या संस्थेच्या सन २०२० - २०२५ या पाच वर्षाकरीता संचालक मंडळाच्या होणाऱ्या निवडणूकीसाठी उमेदवार, मतदार, सूचक व अनुमोदक होणेसाठी प्रतिनिधीस अधिकार देणेबाबत.

ठराव क्र.

.......................................................................... या संस्थेच्या सन २०२० ते २०२५ या पाच वर्षाकरीता होणाऱ्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी संस्थेच्या वतीने मतदान करणे, उमेदवार म्हणून उभे राहणे, सूचक होणे व अनुमोदन देणे याकरीता प्रतिनिधी म्हणून

नाव : श्री./सौ. ------------------------------------------------------------------------ वय -----------

पद :- चेअरमन /व्हा.चेअरमन/ पंच कमिटी सदस्य (संचालक) /सभासद

(वरील योग्य पदास ✓ करावी.)

मु.पो.--------------------------------                    तालुका -----------------------------------

जिल्हा -------------- यांना अधिकार देण्यात येत आहेत.

सूचक    :- श्री./सौ.-------------------------------------------

अनुमोदक :- श्री./ सौ.------------------------------------------

ठराव सर्वानुमते मंजूर

संस्थेचा गोल शिक्का

प्रतिनिधीच्या सहीचा नमुना          सचिव          चेअरमन

(संस्थेचा आडवा शिक्का)

---

संस्थेचा नोंदणी क्रमांक व तारीख :- -----------------------------------------------------------------

| | | | |
|---|---|---|---|
| प्रतिनिधीचा फोन | | संस्था सभासद नंबर :- | |
| संस्थेचा फोन :- | | प्रतिनिधी साक्षांकीत सही | |

संस्थेचा गोल शिक्का

सही/-

चेअरमन/ सचिव/ मॅनेजर/ प्रशासक

**संस्थेचे नाव, पत्ता, नोंदणी क्रमांक**

---

संस्था सभासद नंबर

जा.नं.

दिनांक :-

प्रति,
मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा ..............................................

विषय :- ---------------------------------------------------------------------------

संदर्भ :- ---------------------------- आपले कार्यालयीन पत्र क्र.------------------------

महोदय,

..................................................... या संस्थेच्या येत्या ५ वर्षांकरीता होणाऱ्या संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदार, उमेदवार, सूचक, अनुमोदन देणेकरीता आमच्या ............. संस्थेचे प्रतिनिधी म्हणून श्री./सौ. ....................................... यांना संचालक मंडळ ठराव नंबर ................................. तारीख ...... /......./..........ने अधिकार देणेत आलेले आहेत. सोबत ठरावाची व संस्था नोंदणी प्रमाणपत्राची सही शिक्याची नक्कल जोडली आहे.

तसेच दाखला देणेत येतो की, सदर प्रतिनिधी हे आमच्या संस्थेचे सभासद असून ते थकबाकीदार नाहीत.

कळावे,

आपला विश्वासू,

सचिव चेअरमन
(संस्थेचा आडवा शिक्का)

सोबत ठराव जोडला आहे.